२६५३

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२०

**प्रेसनोट** दिनांक - ०४ /०९/२०२०

दिघी आळंदी वाहतुक विभाग हद्दीतील प्रभाग क्र.४ मधील गणेशनगर मुख्य रस्त्यावर वाहतुक कोंडी होत असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन प्रभाग क्र. ४ बोपखेल मधील गणेशनगर येथील हनुमान मंदीर ते दुर्गा मंदीर यामुख्य रस्त्यावर **तात्पुरत्या** स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.०५/०९/२०२० ते दि.१९/०९/२०२० पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन अंतिम आदेश काढण्यात येईल.

**<u>दिघी आळंदी वाहतुक विभाग अंतर्गत</u>**

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ४ बोपखेल मधील गणेशनगर येथील हनुमान मंदीर ते दुर्गा मंदीर यामुख्य रस्त्यावर | सम-विषम तारखेस पार्किंग |

तरी वरील ठिकाणी सम विषम तारखेस पार्किंग करणेबाबत आदेश (नोटीफिकेशन)करण्यात येत आहे.

Shiremath

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी दिघी आळंदी वाहतुक विभाग
४) ई क्षेत्रिय कार्या. पिंपरी चिंचवड महानगरपालिका
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.